महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०५/०६/२०२३

**परिपत्रक -**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, निर्णय क्र.पीईक्यू-०२२२/प्र.क्र.२५६/पोल-४, दिनांक ०२.०६.२०२३.

**विषय :-** राज्य गुन्हे विभागातील अंगुली मुद्रा विभागातील भरती करण्यात येणाऱ्या तपासणीस / पोलीस उप निरीक्षक (अंगुली मुद्रा) या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.पीईक्यू-०२२२/प्र.क्र.२५६/पोल-४, दि.०२.०६.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०६०२१६४९१४८४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

०५/०६/२३

( सुनिता चौधरी )
कार्यालय अधीक्षक
o/c पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कार्यासन अधिकारी, का.क्र.३अ



Scanned with CamScanner

**राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील अंगुली मुद्रा विभागातील भरती करण्यात येणाऱ्या तपासणीस/ पोलीस उप निरीक्षक (अंगुली मुद्रा) या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : पीईक्यू -०२२२/प्र.क्र.२५६/पोल-४,**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- ०२ जून, २०२३.

<u>संदर्भ</u> :- १) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एफपीबी-३४८०/३१९४४,पोल-४,दि.२८.०८.१९८५

२) Secretary CFPB, NCRB, MHA, New Delhi यांचे पत्र क्र.CFPB (१०५)/AIBE/०९/ २०१८ (२)-NCRB,दि.२७.११.२०१८

३) अपर पोलीस महासंचालक ,गुन्हे अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अपोमसं/ गुअवि/अंमुके/तपासणीस शैक्षणिक अर्हता/२०२३/८२ पुणे, दि.२०.०१.२०२३

<u>प्रस्तावना</u> :-

राज्य गुन्हे अन्वेषण विभागांतर्गत अंगुली मुद्रा विभागातील भरती करण्यात येणाऱ्या तपासणीस/ पोलीस उप-निरीक्षक (अं.मु.) या पदासाठीची शैक्षणिक पात्रता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये "पदवी परिक्षा" ही निश्चित करण्यात आली होती. तथापि, केंद्र शासनांतर्गत येणा-या राष्ट्रीय अपराध अभिलेख केंद्र (NCRB) यांच्या अखत्यारीतील केंद्रीय अंगुली मुद्रा केंद्र (CFPB) या कार्यालयाने अंगुली मुद्रा तज्ञ परीक्षेस बसण्यासाठी शैक्षणिक पात्रता ही "विज्ञान शाखेतील पदवीधर (Science Graduate)/ न्यायवैदयकीय शाखेतील पदवीधर (Forensic Science Graduate)" अशी निश्चित करण्याबाबत संदर्भ क्र.२ अन्वये सर्व राज्यातील अंगुली मुद्रा केंद्राना निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन, तपासणीस/ पोलीस उप-निरीक्षक (अंगुली मुद्रा) या पदासाठीची शैक्षणिक अर्हतेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

राज्य गुन्हे अन्वेषण विभागांतर्गत अंगुली मुद्रा विभागातील यापुढे भरती करण्यात येणाऱ्या तपासणीस/ पोलीस उप-निरीक्षक (अंगुली मुद्रा) या पदासाठी संदर्भ क्र. २ मध्ये निदेशित केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रतेमध्ये "पदवी परिक्षा" या ऐवजी **"मान्यता प्राप्त विदयापीठातील विज्ञान शाखेतील पदवीधर** (Science Graduate) **किंवा न्यायवैदयकीय शाखेतील पदवीधर** (Forensic Science Graduate)**"** अशी सुधारणा करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०६०२१६४९१४८४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने, SUDHAKAR SHAHAJI YADAV

Digitally signed by SUDHAKAR SHAHAJI YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=3e782c1e59acd749fc48c691d7a8c477d6ac39c1904204f442b52d728d48a67a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=A576ADA378C3E1DDFF427C2BC46B5A5C32BC32EF80F7A475ABFA122778AAAD72, cn=SUDHAKAR SHAHAJI YADAV
Date: 2023.06.02 16:51:36 +05'30'

(सुधाकर यादव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक,गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवडनस्ती/गृह विभाग (पोल-४).

Scanned with CamScanner